Jagdamba Education Society's

Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 20/08/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

### News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 04**

आपल्या वाटल्या, आतल्या वाटल्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष

## जागतिक किर्तीचे जादूगार रघुवीर भोपळे



जागतिक किर्तीचे जादुगार रघुवीर भिकाजी भोपळे यांचा जन्म २४ मे १९२४ रोजी झाला. 'जादूगार रघुवीर' हे नाव घेतलं की येणारा प्रतिसाद फारच चांगला असतो. त्याचं कारणही तसंच आहे. त्यांनी आपले सगळे आयुष्य जादू या कलेच्या संवर्धनासाठीच समर्पित केले होते. आपले तन मन धन त्यांनी जादू या कलेसाठी वाहून घेतले. जादू ही एक कला आहे. त्याचा खरे तर उगम हा भारतात झालेला आहे. पाश्चिमात्यांनी त्यात अधिक मूल्यवर्धन केले. पण भारतात जादू या कलेला तंत्रमंत्राचा मुलामा चढवला गेला. त्यातून भोपळे यांनी लोकांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. जादूचे प्रयोग हा आबालवृद्धांच्या उत्सुकतेचा विषय असतो. जादूगार रघुवीर हे या मंडळींना आपल्या जादूने खिळवून ठेवत असत. डोळे बांधून रस्त्यावर मोटरसायकल चालविणे, स्वप्नसृष्टी, नोटांचा पाऊस, हातातून वीजनिर्मिती, भुतांचा नाच इत्यादी प्रयोग करणारे जादूगार रघुवीर म्हणजे अवलियाच होते.

जादूगार रघुवीर हे मूळचे चाकणजवळील आंबेठाणचे. घरच्या बेताच्या परिस्थितीमुळे रघुवीर पुण्यामध्ये आले आणि त्या वेळच्या अनाथ विद्यार्थीगृहामध्ये राहिले. माधुकरी मागून त्यांनी शिक्षण घेतले. एकदा रस्त्याने जात असताना राणा या राजस्थानी कलाकाराला त्यांनी जादूचे खेळ करताना पाहिले. त्यांच्याकडून जादूची ही कला रघुवीर यांनी आत्मसात केली आणि सुमारे ७५ वर्षांपूर्वी पहिला व्यावसायिक प्रयोग केला. गानहिरा हिराबाई बडोदेकर यांनी जादूगार रघुवीर यांना परदेश दौऱ्यावर नेले आणि तेथून त्यांनी मागे वळून पाहिलेच नाही. जादू हा चमत्कार नाही ती हातचलाखी आहे, असे जाहीर करूनच ते खेळाला सुरुवात करायचे. हातचलाखी इतकी जबरदस्त, की लोक त्यांना मांत्रिक-तांत्रिकच समजायचे. भेटून आपल्या खासगी अडचणी सांगायचे. रघुवीरांनी बऱ्याच प्रयत्नांनी चित्र बदलले. जादू या कलेला मोठ्या रंगमंचावर आणले. जादूगार रघुवीर यांचे निधन २० ऑगस्ट १९८४ रोजी झाले.

Nashik Edition
Aug 20, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Jagdamba Education Society's

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401